**नियमित दिवाणी दावा नं.१६/२०२१ मध्ये नि.क्र.२५ वर आदेश.**

**साजीद कमर हाफीज वि. मोहसीन जहूर घराडे–१.**

**(CNR MHRG-13000-254-2021)**

०१. प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादी यांनी दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ७ नियम ११ अन्वये दावा रद्द करण्याकरीता दाखल केलेला आहे.

०२. दोन्ही बाजुचा युक्तीवाद ऐकला. दावा व सोबत कागदपत्रांचे अवलोकन केले. प्रस्तुत कामी खालील मुद्दे उपस्थित होत असून त्या मुद्दयांवर खालील प्रमाणे कारणमिमांसेसह निष्कर्ष देण्यात येत आहेत.

| | **मुद्दे** | | **निष्कर्ष** |
|---|---|---|---|
| ०१. | प्रस्तुत दाव्याची आकारणी योग्य केली आहे का ? | | .. होकारार्थी. |
| ०२. | प्रस्तुत दावा दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ७ नियम ३ अन्वये पुर्तता न केल्याच्या कारणाने काढून टाकणेस पात्र आहे काय ? | | .. नकारार्थी. |
| ०३. | काय आदेश ? | | .. अर्ज नामंजूर करण्यात येत आहे. |

## :: कारणमिमांसा ::

**मुद्दा क्र.१ करीता** :–

०३. या प्रकरणी वादी यांनी प्रस्तुतचा दावा हा प्रतिवादी यांनी

अतिक्रमीत बांधकाम केल्यामुळे सदर बांधकाम मोडुन जागेचा ताबा मागण्यासाठी दाखल केला आहे. सदर दाव्यातील मुल्यांकन हे धा–यानुसार आकारणी असे नमुद करुन सदर मुल्यांकन बॉम्बे स्टॅम्प अ‍ॅक्ट कलम ७ (१) नुसार केल्याचे नमुद केले आहे. तथापि, सदर तपशील या प्रकरणी लागु होत नाही. या प्रकरणी महाराष्ट्र कोर्ट फी अ‍ॅक्ट अन्वये दाव्याची आकारणी करणे आवश्यक असून सदरचा दावा हा ताब्याची मागणी करणारा असल्याचे ध्यानात घेणे आवश्यक आहे. त्यामुळे सदर दाव्याचे मुल्यांकन महाराष्ट्र कोर्ट फी कलम ६ (v) अन्वये करणे आवश्यक आहे. त्याबाबतचे सुस्पष्ट लिखाण करणे गरजेचे आहे. तथापि, वादी यांच्या दाव्यानुसार दावा मिळकत ही शेत जमीन आहे. वादी यांनी धा–या नुसार मिळकतीची बाब नमुद केली असल्याने सदर आकारणी चुकीची आहे असे म्हणता येणार नाही. त्यामुळे प्रतिवादी यांनी कथन केलेली कलम ६ (iii)(v) अशी तरतुद नसल्याने सदर तरतुद ६(v) आहे असे गृहित धरले तरी देखील मुल्यांकन चुकीचे झाले आहे असे म्हणता येणार नाही. सबब, मुद्दा क्र.१ चे उत्तर मी होकारार्थी देत आहे.

**<u>मुद्दा क्र.२ व ३ करीता</u>** :–

०४. दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ७ नियम ३ अन्वये अतिक्रमीत क्षेत्राच्या कब्जासाठी दाखल केलेल्या दाव्यासोबत अतिक्रमीत क्षेत्र दाखविणारा हातनकाशा दाखल करणे आवश्यक आहे. प्रस्तुतचा दावा हा प्रतिवादी यांनी गट क्र.३३५ क्षेत्र १६.५० आर पैकी ४ गुंठे जागेत अतिक्रमण केल्याचे नमुद आहे. सदरचा दावा हा प्रतिवादी यांचा संपुर्ण

क्षेत्रामधील ताबा हटवून मिळण्यासाठी दाखल केला आहे. दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ७ नियम ३ मधील तरतुदी नुसार अतिक्रमण हटवण्याबाबतच्या दाव्यास सदर नकाशाची आवश्यकता आहे. तथापि, प्रस्तुतचा दावा हा प्रत्यक्ष कब्जा मागणीचा असल्याने सदर दाव्यातील अतिक्रमीत बांधकामाचे क्षेत्र ठरवण्याकरीता सदर नकाशा द्वारे त्याच्या निश्चित स्थानाबाबत परिस्थिती आणण्याची आवश्यकता नाही. त्यामुळे सदर तरतुद या दाव्यास लागु होणार नाही. सबब, मुद्दा क्र.२ चे उत्तर मी नकारार्थी देण्यात येत आहे. सबब, मुद्दा क्र.३ करीता मी खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे.

:: **आदेश** ::

०१. नि.क्र.२५ चा अर्ज नामंजूर करण्यात येत आहे.

०२. येणे प्रमाणे अर्ज निकाली काढण्यात येत आहेत.

श्रीवर्धन. ( प्र. ग. लंबे )

दिनांक : ०६/०५/२०२२. दिवाणी न्यायाधीश क. स्तर, श्रीवर्धन.

..